दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | रविवार, 23 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 106 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# परळीत थरार!








## पण ग्रामीण भागातील वाढती गुन्हेगारी चिंतेची बाब ?

### IPS ऋषिकेश शिंदे यांच्या कार्याचे कौतुकच मात्र परळी ग्रामीण हद्दीमध्ये वाढत आहे गुन्हेगारी

### मुलीला दूर केल्याच्या रागातून झाडल्या गोळ्या; परसराम जाधव गजाआड

■ विशेष प्रतिनिधी
| परळी ग्रामीण

परळी तालुक्यातील खोडवासावरगाव तांडा येथे २४ ऑगस्टच्या रात्री एक अत्यंत धक्कादायक आणि थरारक घटना घडली आहे. मुलीला आपल्यापासून दूर केल्याचा जुना राग मनात धरून एका ३१ वर्षीय तरुणाने थेट एका कुटुंबावर अंधाधुंद गोळीबार केला. या भयानक हल्ल्यात ८५ वर्षांचे वृद्ध जखमी झाले असून परळी ग्रामीण पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे.

#### कुटुंब घराबाहेर असतानाच गोळीबार

■ मिळालेल्या माहितीनुसार, खोडवासावरगाव तांडा येथील रहिवासी प्रकाश फुलसिंग जाधव (वय ५०) हे २१ ऑगस्ट रोजी रात्री ७:३० वाजताच्या सुमारास आपली पत्नी आणि ८५ वर्षीय वृद्ध वडील फुलसिंग हरी जाधव यांच्यासोबत घराच्या दारात बसलेले होते. याच दरम्यान, जुन्या वादातून चिडलेला परसराम जाधव (वय ३१, रा. खोडवासावरगाव तांडा) हा हातात बंदूक घेऊन त्या ठिकाणी धडकला.

#### ३ ते ४ गोळ्या झाडल्या वृद्ध जखमी

■ माझ्यापासून मुलीला दूर का केले? असा सवाल करत आरोपी परसराम याने प्रकाश जाधव व त्यांच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याच्या उद्देशाने थेट बंदुकीतून ३ ते ४ गोळ्या झाडल्या. अचानक झालेल्या या गोळीबारामुळे गावात प्रचंड घबराट पसरली. या प्राणघातक हल्ल्यात ८५ वर्षीय वृद्ध फुलसिंग जाधव यांच्या डाव्या डोळ्याला दुखापत झाली आहे. आरोपीने गोळ्या झाडून फिर्यादीच्या घराचा मुख्य दरवाजाचे नुकसानही केले.

#### पोलीस ॲक्शन मोडवर विविध कलमांखाली गुन्हे दाखल

■ घटनेची माहिती मिळताच परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीस निरीक्षक शिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पागोटे, तपासी अधिकारी सपोनि सदानंद मेंडके व पोउपनि शेख यांनी घटनास्थळाची पाहणी केली. आरोपी परसराम जाधव याच्याविरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद क्र. ३९६/२०२६ नुसार BNS कलम १०९ (जीवे मारण्याचा प्रयत्न), ३५२, ३५१(३), ३२४(२) सह अर्म्स ॲक्ट (शस्त्र अधिनियम) कलम ३, २५ अन्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### कारवाईचे कौतुकच, पण गुन्हेगारीवर प्रश्नचिन्ह

■ उपविभागीय पोलीस अधिकारी (DySP) आणि आयपीएस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली या उपविभागात पोलीस यंत्रणा तातडीने ॲक्शन मोडवर येत आहे. मध्यरात्रीच आरोपीला जेरबंद करून कोठडी मिळवून देण्यात पोलिसांना यश आले असले, तरी मागील काही दिवसांपासून परळी ग्रामीण भागात गुन्हेगारीचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. यामुळे 'परळी ग्रामीण पोलीस स्टेशन गुन्हेगारीचा कणा मोडण्यात कमी पडत आहे का?' असा गंभीर प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमधून विचारला जात आहे.

#### सकाळी १० वाजेपर्यंत मुलगी आणून द्या, नाहीतर...

■ हल्ला केल्यानंतरही आरोपीचा राग शांत झाला नव्हता. त्याने प्रकाश जाधव आणि त्यांच्या कुटुंबीयांना अत्यंत अश्लील भाषेत शिवीगाळ करत, उद्या सकाळी १० वाजेपर्यंत मुलीला माझ्याकडे आणून दिले नाही, तर तुमच्या संपूर्ण कुटुंबाला जीवे मारून टाकीन, अशी उघड धमकी दिली व तिथून पसार झाला.

**कारवाईची तत्परता, पण सुरक्षेचा प्रश्न? :** अंबाजोगाई उपविभागाचे DySP आणि IPS अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या शिस्तबद्ध मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तातडीने सूत्रे हलवून आरोपीला २४ तासांच्या आत अटक केली. आयपीएस शिंदेंच्या नेतृत्वाखाली उपविभागातील प्रमुख कारवाया गतीने होत असल्या तरी, "परळी ग्रामीणच्या हद्दीत गुन्हेगारांचे मनोबल एवढे कसे वाढले?" असा खडा सवाल आता नागरिक विचारत आहेत.

# पालकांनी मुलांच्या शिक्षणावर जागता पहारा ठेवावा..!

## दिशाहीन होण्यापासून मुलांना वाचवणे ही पालकांचीही जबाबदारी राम कुलकर्णी



■ अंबाजोगाई (प्रतिनिधी)

पालकांनी मुलांना महाविद्यालयात शिक्षणासाठी पाठविले म्हणजे आपली जबाबदारी संपली, असे न समजता त्यांच्या शिक्षणाबरोबरच संगत, सवयी, वर्तन आणि व्यक्तिमत्त्व विकासाकडेही जागरूकतेने लक्ष द्यावे. अकरावी - बारावी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून, या काळात मुलांना दिशाहीन होण्यापासून वाचविण्याची जबाबदारी पालकांचीही आहे, असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते रामभाऊ कुलकर्णी यांनी केले.

खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, अंबाजोगाई येथे शनिवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहात आयोजित पालक मेळावा - २०२६ मध्ये मार्गदर्शक तथा उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.दीपक फुलारी होते. यावेळी मंचावर उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड, डॉ.बिभीषण फड, उपप्राचार्य आनंद पाठक, पर्यवेक्षक जिजाराम कावळे प्रा.प्रल्हाद तावरे आदींची उपस्थिती होती. राम कुलकर्णी म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक आणि वेगाने बदलणाऱ्या युगात विद्यार्थ्यांसमोर अनेक आव्हाने आहेत. मुलगा असो अथवा मुलगी, ते नियमित महाविद्यालयात जातात का, वर्गातील उपस्थिती कशी आहे, मित्र मैत्रिणींची संगत कशी आहे, ते व्यसनांपासून दूर आहेत का आणि चुकीच्या मार्गावर तर जात नाहीत ना, याकडे पालकांनी संवेदनशीलतेने लक्ष देणे आवश्यक आहे. मुलांच्या आयुष्यावर पालकांनी जागता पहारा ठेवण्याची गरज आहे, असे आवाहन त्यांनी केले. पालकांनी मुलांना चंगळवादापासून दूर ठेवून शिक्षण, संस्कार, चारित्र्य, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रभक्तीची मूल्ये आत्मसात करण्यास प्रोत्साहन द्यावे. केवळ पदवी मिळविण्यापेक्षा चांगला आणि जबाबदार नागरिक घडणे अधिक महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. खोलेश्वर महाविद्यालय हे केवळ अध्ययन - अध्यापनाचे केंद्र नसून संस्कार केंद्र आहे. भारतीय शिक्षण प्रसारक संस्था राष्ट्रभक्ती, सेवा, समर्पण, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकीची मूल्ये जपत गुणवत्तापूर्ण व संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य करीत आहे. समाजाचा संस्थेवरील वाढता विश्वास ही अभिमानाची बाब असल्याचे कुलकर्णी यांनी नमूद केले. नवीन शैक्षणिक धोरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, वाढती स्पर्धा आणि विद्यार्थ्यांच्या बदलत्या मानसिकतेच्या पार्श्वभूमीवर पालक - शिक्षक - विद्यार्थी यांच्यातील संवाद अधिक दृढ होणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक शैक्षणिक टप्प्यावर पालकांनी जागरूक राहिल्यास त्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल आणि त्यासोबतच संपूर्ण कुटुंबाचे भविष्यही सुरक्षित व आनंदी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.दीपक फुलारी यांनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक, अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालकांचा सहभाग महत्त्वाचा असून पालक मेळाव्यामुळे पालक व महाविद्यालय यांच्यातील संवाद अधिक दृढ होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून उपप्राचार्य आनंद पाठक यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रम आणि कार्यक्रमाची माहिती पालकांना दिली. यावेळी प्रा.प्रसन्ना जोशी, प्रा. प्रल्हाद तावरे, प्रा.माणिक पोखरकर प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी यांनी महाविद्यालयाची बलस्थाने तसेच विविध उपक्रमांची माहिती उपस्थित पालकांना दिली. यावेळी पालकांची उपस्थिती लक्षणीय होती पालक, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कालिदास चिटणीस यांनी केले, तर उपस्थितांचे आभार पर्यवेक्षक जिजाराम कावळे यांनी मानले. दोन सत्रांत संपन्न झालेल्या या पालक मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# शिक्षणाचा गौरव !


## महाराष्ट्रातील ४ शिक्षकांना 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६' बीडच्या केज येथील डॉ. कविता गित्ते यांचा बहुमान

■ विशेष प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात अत्यंत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला आकार देणाऱ्या देशभरातील ४८ आदर्श शिक्षकांची 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६' साठी अधिकृत निवड झाली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील चार उत्कृष्ट शिक्षकांनी बाजी मारली असून, यात बीड जिल्ह्यातील केज येथील डॉ. कविता नृसिंहराव गिट्टे यांचा गौरवशाली समावेश आहे. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते या पुरस्कारांचे औपचारिक वितरण करण्यात येणार आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागामार्फत दरवर्षी हा सर्वोच्च सन्मान दिला जातो. नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, व्यक्तिमत्त्व विकास, शाळेचा सर्वांगीण कायापालट आणि सामाजिक बांधिलकी जपत दिलेले उल्लेखनीय योगदान लक्षात घेऊन या शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारासाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा कडक तीन टप्प्यांत पारदर्शक निवड प्रक्रिया राबवण्यात आली. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या राष्ट्रीय पोर्टलवर १५ जून ते २० जुलै २०२६ दरम्यान ऑनलाइन स्व-नामांकन मागवण्यात आले होते. यातून अंतिम टप्प्यात डॉ. कविता गित्ते यांच्या नावावर मोहर उमटली. ग्रामीण भागात शिक्षणाचा दीप उजळवून बीड जिल्ह्याचा नावलौकिक देशपातळीवर पोहोचवल्याबद्दल डॉ. कविता गित्ते यांच्यावर सर्वच स्तरांतून कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.









#### महाराष्ट्रातील मानकरी

- डॉ. कविता नृसिंहराव गित्ते (बीड), कुंदा जयवंत बच्छाव (नाशिक)
- वैभव वसंतराव कुलकर्णी (लातूर), शिवप्रसाद अरविंद टिंगरे (सातारा)

## संपादकीय

# आता तरी बेस्टचे अपघात टळतील?

भौगोलिक नकाशे आणि संदर्भ एक्सप्लोर करणे

मुंबईकरांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा वाहतूक पर्याय म्हणजे बेस्ट बस सेवा. दररोज लाखो प्रवाशांना सुरक्षितपणे त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचविण्याची जबाबदारी बेस्टवर आहे. मात्र गेल्या काही महिन्यांत बेस्टच्या बस अपघातांच्या घटनांमध्ये झालेली वाढ ही केवळ प्रशासनासाठीच नव्हे, तर प्रत्येक मुंबईकरासाठी चिंतेची बाब बनली आहे. या अपघातांमुळे अनेकांना जीव गमवावा लागला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. त्यामुळे एकच प्रश्न उपस्थित होत आहे—आता तरी बेस्टचे अपघात टळतील का?

काही वर्षांत बेस्टच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर कंत्राटी बस गाड्यांचा समावेश करण्यात आला आहे. आज बेस्टच्या ताफ्यात स्वमालकीच्या २०० च्या आसपास बस असून कंत्राटी बसची संख्या अडीच हजारच्या आसपास आहे. परिणामी, अपघातांच्या घटनांमध्ये कंत्राटी बसचे प्रमाणही अधिक दिसून येते. याचा अर्थ असा नाही की कंत्राटी चालक निष्काळजी असतात; परंतु वाढती बससंख्या, अनुभवी चालकांचा तुटवडा आणि कामाचा ताण या सर्वांचा परिणाम सुरक्षिततेवर होत असल्याचे चित्र दिसते.

कंत्राटदार चालकांना नियुक्तीपूर्वी प्रशिक्षण दिले जाते. वाहन हाताळणी, वाहतूक नियम, प्रवासी सुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थिती याविषयी त्यांना मार्गदर्शन केले जाते. तरीही प्रत्यक्ष रस्त्यावरची परिस्थिती प्रशिक्षणापेक्षा अधिक आव्हानात्मक असते. मुंबईतील अरुंद रस्ते, वाढती वाहतूक, सतत बदलणारी सिग्नल व्यवस्था, पावसाळ्यातील खराब रस्ते आणि प्रवासाचा ताण या सर्वांचा सामना करण्यासाठी केवळ प्राथमिक प्रशिक्षण पुरेसे ठरत नाही. सातत्याने पुनर्प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित मार्गदर्शन तितकेच आवश्यक आहे. आज बाजारात प्रशिक्षित बसचालक मिळणे ही मोठी समस्या बनली आहे. जड वाहन चालविण्यासाठी आवश्यक परवाना, अनुभव आणि शिस्त असलेले चालक कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे अनेक कंत्राटदारांना चालकांची भरती करताना अडचणी येतात. चालकांची कमतरता भरून काढण्यासाठी काही वेळा तुलनेने कमी अनुभव असलेल्या चालकांची नियुक्ती करावी लागते. अशा परिस्थितीत अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे, बेस्टचे कायमस्वरूपी चालक अनुभवी आणि कुशल मानले जातात. मात्र त्यांचे वेतन, सेवा अटी आणि इतर खर्च कंत्राटी चालकांच्या तुलनेत अधिक असल्याने कंत्राटदारांसाठी त्यांची नियुक्ती आर्थिकदृष्ट्या अवघड ठरते. परिणामी, अनुभवी चालकांची कमतरता अधिक जाणवू लागते. हा प्रश्न केवळ कंत्राटदारांचा नसून संपूर्ण सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसमोरील गंभीर आव्हान आहे. गेल्या तीन-चार महिन्यांत घडलेल्या काही अपघातांच्या प्राथमिक माहितीनुसार अनेक घटनांमध्ये बसमध्ये मोठा तांत्रिक बिघाड आढळून आलेला नाही. काही प्रकरणांमध्ये मानवी चुका, चुकीचा अंदाज, वेगावरील नियंत्रणाचा अभाव किंवा रस्त्यावरील परिस्थितीचे योग्य मूल्यमापन न होणे ही कारणे पुढे आली. याचा अर्थ चालकांचे सातत्यपूर्ण कौशल्यवर्धन आणि मानसिक तयारी यावर अधिक भर देण्याची गरज आहे. आजच्या आधुनिक इलेक्ट्रिक आणि स्वयंचलित प्रणाली असलेल्या बस पारंपरिक डिझेल बसपेक्षा तांत्रिकदृष्ट्या अधिक प्रगत आहेत. अशा वाहनांमधील ब्रेकिंग प्रणाली, ऊर्जा प्रणाली, इलेक्ट्रॉनिक नियंत्रण यंत्रणा आणि सुरक्षा वैशिष्ट्यांची माहिती चालकांना सखोलपणे असणे आवश्यक आहे. वाहन चालविण्याचे कौशल्य जितके महत्त्वाचे आहे, तितकीच वाहनाच्या तांत्रिक प्रणालींची समजही महत्त्वाची ठरते.

प्रत्येक चालकासाठी नियमित पुनर्प्रशिक्षण अनिवार्य केले पाहिजे. आधुनिक ड्रायव्हिंग सिम्युलेटरचा वापर, आपत्कालीन परिस्थितीतील सराव, मानसोपचार तज्ज्ञांकडून तणाव व्यवस्थापनाचे प्रशिक्षण, थकवा ओळखण्याचे मार्गदर्शन आणि सुरक्षित वाहनचालनावरील कार्यशाळा यामुळे चालकांची कार्यक्षमता वाढू शकते. त्याचबरोबर अनुभवी चालकांकडून नव्या चालकांना मार्गदर्शन करण्याची प्रभावी व्यवस्था उभारणेही आवश्यक आहे. याशिवाय चालकांच्या कामाच्या वेळेवरही लक्ष देणे गरजेचे आहे. सलग दीर्घकाळ वाहन चालविल्यास थकवा वाढतो आणि निर्णयक्षमता कमी होऊ शकते. त्यामुळे पुरेशी विश्रांती, नियोजित ड्युटी, आरोग्य तपासणी आणि मानसिक स्वास्थ्य याकडेही तितकेच गांभीर्याने पाहिले पाहिजे. सुरक्षित प्रवासाची सुरुवात सुरक्षित आणि सक्षम चालकापासूनच होते.

कंत्राटदार, बेस्ट प्रशासन आणि राज्य शासन यांनी संयुक्तपणे चालक प्रशिक्षणासाठी आधुनिक प्रशिक्षण केंद्रे उभारण्याची आवश्यकता आहे. नवीन चालक तयार करणे, विद्यमान चालकांचे कौशल्य वाढविणे आणि सुरक्षित वाहनचालनाची संस्कृती विकसित करणे ही काळाची गरज आहे. अपघातानंतर चौकशी करण्यापेक्षा अपघात होऊच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाय अधिक प्रभावी ठरतील. तंत्रज्ञानाचाही अधिक वापर करणे आवश्यक आहे. बसमध्ये चालक सहाय्यक प्रणाली, वेग नियंत्रण यंत्रणा, थकवा ओळखणारी साधने, डॅशकॅम, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सुरक्षा प्रणाली आणि नियमित तांत्रिक तपासणी यामुळे अपघातांचे प्रमाण कमी करण्यात मदत होऊ शकते. मात्र कोणतेही तंत्रज्ञान सक्षम आणि प्रशिक्षित चालकाची जागा घेऊ शकत नाही.

बेस्टची बस ही केवळ एक वाहनसेवा नसून मुंबईची जीवनवाहिनी आहे. त्यामुळे प्रत्येक अपघात हा केवळ आकडा नसून एका कुटुंबाच्या आयुष्याशी जोडलेला असतो. सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड परवडणारी नाही. चालकांची कमतरता भरून काढणे, दर्जेदार प्रशिक्षण देणे, तांत्रिक ज्ञान वाढविणे आणि सुरक्षित वाहनचालनाला सर्वोच्च प्राधान्य देणे या उपाययोजना तातडीने राबविल्या गेल्या तर भविष्यातील अनेक अपघात टाळता येऊ शकतात. मुंबईकरांना वेगवान नव्हे, तर सुरक्षित प्रवास हवा आहे. आणि त्यासाठी सक्षम चालक, आधुनिक प्रशिक्षण आणि जबाबदार व्यवस्थापन यांच्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. बेस्टला नेमके हेच करायचे आहे.

# एआयच्या माध्यमातून महिलांनी सक्षमीकरणाची नवी संधी साधावी : विजया रहाटकर

### ‘यशोदा एआय’ उपक्रमांतर्गत ‘कृत्रिम बुद्धिमत्ता आणि महिला’ या विषयावरील क्षमता बांधणी कार्यशाळा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ :**




एआयच्या माध्यमातून महिलांना शिक्षण, रोजगार, व्यवसाय व दैनंदिन जीवनात प्रगती करण्यासाठी नवी साधने उपलब्ध होत आहेत. महिलांनी एआयचे स्वरूप समजून घेऊन त्याचा योग्य वापर करावा. उपलब्ध संधींचा लाभ घेऊन एआयला सक्षमीकरणाचे साधन बनवावे, असे आवाहन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

राष्ट्रीय महिला आयोग व राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘यशोदा एआय’ उपक्रमांतर्गत ‘कृत्रिम बुद्धिमत्ता आणि महिला’ या विषयावरील क्षमता बांधणी कार्यशाळेत त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाचे सदस्य सचिव सुदीप जैन, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., राज्य महिला आयोगाच्या सदस्या सचिव नंदिनी आवाडे, राष्ट्रीय महिला आयोगाचे संचालक राम अवतार सिंह, उपसचिव डॉ. पद्मश्री बेनाडे, उपायुक्त कृष्णा राठोड, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी कोमल कोरे, व्याख्याते उन्मेष जोशी, स्मिता कासार आदी उपस्थित होते.

श्रीमती विजया रहाटकर म्हणाल्या, कृत्रिम बुद्धिमत्ता ही भविष्याची बाब नसून वर्तमानातील गरज आहे. महिलांचे डिजिटल सक्षमीकरण, सुरक्षितता व आत्मविश्वास वाढविणे हा ‘यशोदा एआय’ उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. माहिती संकलन व विश्लेषण, आरोग्य सेवा, तपास प्रक्रिया तसेच दैनंदिन प्रशासकीय कामांना एआयमुळे गती मिळू शकते. कामाच्या स्वरूपानुसार एआयचा योग्य पद्धतीने वापर करणे आवश्यक आहे.

महिला उद्योजक व बचत गटातील महिलांनीही एआयचा उपयोग व्यवसायवृद्धीसाठी करावा, व्यवसायासाठी प्रभावी संदेश तयार करणे, समाजमाध्यमांवर प्रचार करणे तसेच व्यवसायाशी संबंधित सर्जनशील साहित्य तयार करण्यासाठी एआयची मदत घेता येते. महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांची माहिती असणे आवश्यक असून बालविवाह आणि कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ यांसारख्या समस्यांविरोधात संघटितपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

गृहिणींच्या दैनंदिन कामातही एआय उपयुक्त ठरू शकतो, मुलांना अभ्यासातील अवघड विषय सोप्या पद्धतीने समजावून घेण्यासाठी, घरातील कामांचे नियोजन करण्यासाठी तसेच विविध माहिती मिळविण्यासाठी एआयचा वापर करता येतो. एआयचा वापर करताना स्वतःची विचारशक्ती कायम ठेवावी, गोपनीयतेचे संरक्षण करावे व तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

डिजिटल सुरक्षिततेबाबत महिलांनी अधिक जागरूक राहणे आवश्यक आहे. छायाचित्रांमध्ये फेरफार, डीपफेक, आवाजाची नक्कल, ऑनलाइन फसवणूक, सायबर छळ, बनावट खाती आणि वैयक्तिक माहितीचा गैरवापर यांपासून सावध राहण्याचे त्यांनी आवाहन केले. प्रत्येक महिलेला कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलभूत माहिती असणे हे आता जीवनकौशल्याचा एक भाग बनले आहे. ‘एआय सखी’च्या माध्यमातून एक महिला एआय शिकून इतर महिलांना त्याचे ज्ञान देईल आणि अशा प्रकारे डिजिटल सक्षमीकरणाची साखळी देशभर निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

श्री. जैन म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रसार संगणकाच्या तुलनेत अत्यंत वेगाने होत आहे. संगणकाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनण्यासाठी २० ते ३० वर्षे लागली होती, तर कृत्रिम बुद्धिमत्तेने अल्पावधीतच आपल्या जीवनावर प्रभाव निर्माण केला आहे. या तंत्रज्ञानातील धोके समजून घेऊन सुरक्षिततेची काळजी घेणे, विशेषतः महिलांनी सायबर तंत्रज्ञानाची माहिती घेऊन सक्षम होणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून हुबेहूब आवाज व चित्रफिती तयार करून फसवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे अशा आवाजावर किंवा चित्रफितीवर तत्काळ विश्वास न ठेवता त्याची खात्री करणे आवश्यक आहे. आभासी जगातील सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी तंत्रज्ञानाची माहिती व आवश्यक दक्षता महत्त्वाची आहे. ‘यशोदा एआय’ उपक्रमातील मार्गदर्शन महिलांना सक्षम करण्यास उपयुक्त ठरेल, असेही ते म्हणाले. श्री. येडगे म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे साधन आहे. त्याचा उपयोग दैनंदिन कामे सुलभ करण्याबरोबरच महिला सुरक्षेसाठीही करता येऊ शकतो. तंत्रज्ञान सर्वांसाठी उपलब्ध असून कृत्रिम बुद्धिमत्ता सहज वापरता येणारे तंत्रज्ञान आहे. त्यामुळे महिलांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा आत्मविश्वासाने वापर करून स्वतःला तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सक्षम करावे.

प्रास्ताविकात श्रीमती आवाडे म्हणाल्या, कृत्रिम बुद्धिमत्ता हे महिलांच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे साधन असून महिलांनी त्याचा सकारात्मक वापर करून आपली प्रगती व उज्ज्वल भवितव्य घडवावे. ‘यशोदा एआय’ उपक्रमाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थिनी, गृहिणी, उद्योजिका तसेच प्रौढ महिलांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान पोहोचणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाच्या या बदलत्या युगात महिलांनी त्याचा आत्मविश्वासाने स्वीकार करून ज्ञान, कौशल्य व आर्थिक सक्षमीकरणासाठी त्याचा उपयोग करावा, असेही त्यांनी सांगितले. यावेळी महिलांनी दैनंदिन वापरात एआयचा कसा उपयोग करायचा, याविषयी स्मिता कासार तसेच सायबर सुरक्षा विषयावर उन्मेष जोशी, ‘पॉश’ जनजागृती विषयावर दिपाली श्रीवास्तव आणि डिजिटल मार्केटिंग विषयावर शिवम गर्ग यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# खवड्या डोंगर दुर्घटनेला कौटुंबिक वादाची पार्श्वभूमी?

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

वाळूज एमआयडीसी परिसरातील तिसगावजवळच्या खवड्या डोंगरावर २१ ऑगस्ट २०२६ रोजी घडलेल्या हृदयद्रावक घटनेत एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. १९ वर्षीय कुणाल चांदगुडे, त्याचे वडील मुरलीधर चांदगुडे (४८) आणि आई संगीता चांदगुडे यांच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, या घटनेनंतर संगीता चांदगुडे यांच्या जुन्या सोशल मीडिया व्हिडिओंची चर्चा सुरू झाली असून, त्यातून कुटुंबातील अंतर्गत वाद आणि तणावाची पार्श्वभूमी समोर येत असल्याचे दिसत आहे.

जुन्या व्हिडिओंमध्ये कौटुंबिक वादांचा उल्लेख :

संगीता चांदगुडे यांच्या यूट्यूब चॅनेलवरील काही जुन्या व्हिडिओंमध्ये त्यांनी कौटुंबिक नातेसंबंध आणि घरातील वादांबाबत भाष्य केले होते. एका व्हिडिओमध्ये त्यांनी नणंदेला उद्देशून मुलाच्या शिक्षणाचा मुद्दा उपस्थित करत नाराजी व्यक्त केली होती. “माझ्या मुलाचं शिक्षण बंद होईल असं वाटलं का?” असा सवाल करत त्यांनी कौटुंबिक वादामुळे आपल्यावर आणि मुलाच्या शिक्षणावर परिणाम होणार नसल्याचे म्हटले होते. या व्हिडिओतील वक्तव्यांमुळे कुटुंबात पूर्वीपासूनच काही मतभेद होते का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. डोंगरावर गेला, 3 तास कड्यावर उभा राहिला; उडी मारणाऱ्या मुलाला वाचवताना आई-वडिलांचाही अंत छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज एमआयडीसी ...

### पती आणि नणंदेच्या नात्यावरही भाष्य :

आणखी एका व्हिडिओमध्ये संगीता यांनी पती आणि नणंदेच्या नात्याबाबत नाराजी व्यक्त केली होती. पतीच्या कठीण काळात पत्नीने दिलेल्या साथीसंदर्भात त्यांनी भावनिक भाष्य केले होते. या व्हिडिओंमधून त्यांच्या मनातील नाराजी आणि कौटुंबिक तणावाची काहीशी कल्पना येते. मात्र, या जुन्या व्हिडिओंमधील कौटुंबिक वादांचा खवड्या डोंगरावरील घटनेशी थेट संबंध आहे, असे अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेले नाही. या दिशेने कोणतीही निष्कर्षात्मक माहिती समोर आलेली नाही.

### सोशल मीडियावर माय-लेकाचे भावनिक क्षण :

दुसरीकडे, संगीता यांनी आपल्या यूट्यूब चॅनेलवर मुलगा कुणालसोबतचे अनेक भावनिक क्षणही शेअर केले होते. एका व्हिडिओमध्ये कुणाल आपल्या आईची ओटी भरताना दिसत आहे. त्यामुळे सोशल मीडियावरील या व्हिडिओंमध्ये एका बाजूला माय-लेकामधील जिव्हाळ्याचे नाते दिसते, तर दुसऱ्या बाजूला कौटुंबिक मतभेदांचा उल्लेख आढळतो.

### खवड्या डोंगरावर नेमकं काय घडलं?

२१ ऑगस्ट रोजी खवड्या डोंगरावर कुणालने टोकाचे पाऊल उचलण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. त्याला खाली उतरवण्यासाठी आई संगीता यांनी आर्त विनवणी केली. पोलीस, स्थानिक नागरिक आणि कुटुंबीयांकडूनही त्याला समजावण्याचे प्रयत्न करण्यात आले. यावेळी संगीता यांनी कुणालला खाली येण्याची विनंती करत, पतीसोबतचे वाद संपवून त्याच्यासोबत राहण्याची तयारी दर्शवल्याचे सांगितले जाते. मात्र, कुणालने आपल्याला कोणीही समजून घेत नसल्याची भावना व्यक्त केल्याचे समोर आले आहे. यानंतर घडलेल्या घटनेत कुणालसह त्याचे आई-वडील तिघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला.

# रुग्णहिताला प्राधान्य देत एकत्रित योजनेची प्रभावी अंमलबजावणी

### दोन लाभार्थ्यांना 1.20 लाखांचा परतावा; जनजागृतीपासून रुग्णांच्या दारी सेवा पोहोचविण्यापर्यंत डॉ. रविंद्र जगतकर यांचा सातत्यपूर्ण पुढाकार

**ठाणे : प्रतिनिधर**

एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (Integrated MJPJAY & AB-PMJAY) ही शासनाची महत्त्वाकांक्षी आरोग्य योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी ठाणे जिल्ह्यात विविध स्तरांवर सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात येत आहेत. रुग्णहिताला सर्वोच्च प्राधान्य, संवेदनशील प्रशासन, पारदर्शकता आणि तत्पर सेवा या भूमिकेतून डॉ. रविंद्र जगतकर, वरिष्ठ जिल्हा समन्वयक अधिकारी, ठाणे हे योजनेची जनजागृती आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आले आहेत.

### गाव-वाड्या-पाड्यांपर्यंत पोहोचलेली जनजागृती

योजनेचा लाभ केवळ शहरांपुरता मर्यादित न राहता दुर्गम ग्रामीण भागातील प्रत्येक पात्र कुटुंबापर्यंत पोहोचावा, यासाठी डॉ. जगतकर यांच्या पुढाकारातून विविध स्तरांवर जनजागृती करण्यात आली आहे. खेडोपाडी, गाव-वाड्या-पाड्यांमध्ये Ayushman Card शिबिरे आयोजित करून अनेक लाभार्थ्यांना स्वखर्चाने Ayushman Card तयार करून देण्याचा समाजाभिमुख उपक्रमही राबविण्यात आला आहे. यामागील उद्देश केवळ कार्ड तयार करणे नसून, भविष्यात गरज भासल्यास संबंधित लाभार्थ्याला उपचाराच्या वेळी योजनेचा लाभ सहज उपलब्ध व्हावा, हा आहे. आरोग्य योजनेची



माहिती, पात्रता, उपचाराचा लाभ, रुग्णालयातील प्रक्रिया आणि लाभार्थ्यांच्या अधिकारांबाबत प्रत्यक्ष संवादातून जनजागृती करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. त्यामुळे शासनाची योजना आणि सामान्य नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्यास मदत झाली आहे.

### रुग्णांच्या घरी जाऊन 1.20 लाखांचा परतावा

याच रुग्णकेंद्री कार्यपद्धतीचा प्रत्यय नुकत्याच झालेल्या कार्यवाहीतून आला. डॉ. रविंद्र जगतकर यांनी लाभार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली, त्यांच्या अडचणी व तक्रारी जाणून घेतल्या आणि संबंधित कार्यवाही पूर्ण करून त्यांना देय असलेली रक्कम परत करण्यात आली.

**या कार्यवाहीअंतर्गत**

- **श्री. शशिकांत दिवेकर 50,000/-**
- **श्री. दिपक रेवतीरमन झा 70,000/-**
- **अशा प्रकारे दोन्ही लाभार्थ्यांना एकूण 1,20,000/- (एक लाख वीस हजार रुपये) परत करण्यात आले.**

### कार्यालयातून नव्हे, तर रुग्णांच्या दारी प्रशासन

रुग्णांच्या समस्या ऐकण्यासाठी रुग्णांनी कार्यालयात येण्याची वाट पाहण्याऐवजी स्वतः रुग्णांच्या घरी जाऊन त्यांची विचारपूस करणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि शक्य तितक्या तत्परतेने कार्यवाही करणे, ही डॉ. जगतकर यांच्या कार्यपद्धतीची विशेष बाब ठरत आहे.

यापूर्वीही Ayushman Card जनजागृती, ग्रामीण भागातील शिबिरे, रुग्णांच्या तक्रारींचे निराकरण, रुग्णालयांना मार्गदर्शन, योजनेच्या अंमलबजावणीचा सातत्यपूर्ण आढावा आणि विविध स्तरांवर समन्वय साधून योजनेचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

### “योजना कागदावर नव्हे, तर जनतेच्या जीवनात दिसली पाहिजे”

“शासकीय योजना ही केवळ कागदोपत्री प्रक्रिया नसून तिचा प्रत्यक्ष लाभ शेवटच्या पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचणे, हीच खरी यशस्वी अंमलबजावणी आहे,” या विचारातून डॉ. रविंद्र जगतकर यांचे कार्य सुरू आहे.

जनजागृतीपासून Ayushman Card निर्मितीपर्यंत, रुग्णांच्या तक्रार निवारणापासून त्यांच्या घरी भेट देऊन लाभ मिळवून देण्यापर्यंत आणि योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी सोडविण्यापासून रुग्णहिताचे प्रश्न प्रत्यक्ष हाताळण्यापर्यंत सातत्यपूर्ण कार्यतत्परता आणि सामाजिक बांधिलकी त्यांच्या कार्यातून दिसून येते.

त्यांच्या विविध समाजाभिमुख उपक्रमांची विविध स्तरांवर दखल घेण्यात आली असून, त्यांच्या कार्याला विविध पुरस्कार, सन्मान व प्रशंसेच्या माध्यमातून गौरविण्यात आले आहे. मात्र, कोणत्याही पुरस्कारापेक्षा गरजू रुग्णाच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान आणि शासनाच्या योजनेचा मिळालेला प्रत्यक्ष लाभ हेच आपल्या कार्याचे खरे समाधान आहे, अशी त्यांची भूमिका आहे.

### रुग्णहिताचा हा प्रवास कायम सुरू राहणार

योजनेचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविणे, ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांमध्ये जनजागृती वाढविणे, रुग्णांच्या समस्या तातडीने सोडविणे आणि ‘रुग्ण प्रथम’ या भावनेतून आरोग्यसेवा अधिक संवेदनशील व लोकाभिमुख करणे, या दिशेने ठाणे जिल्ह्यातील प्रयत्न अधिक गतिमान करण्यात येत आहेत. रुग्णहित हेच ध्येय • जनजागृती हेच माध्यम • पारदर्शकता हीच कार्यपद्धती • सेवा हीच सामाजिक बांधिलकी

**डॉ. रविंद्र प्रकाश जगतकर वरिष्ठ जिल्हा समन्वयक अधिकारी, ठाणे-पालघर एकत्रित**
MJPJAY & AB-PMJAYa

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# भांबच्या मातीतून उच्च पदापर्यंत झेप आकाश नाईक यांच्या यशाला महागावची दणदणीत सलामी

## ग्रामीण मातीतून उच्च पदापर्यंत झेप; भव्य मिरवणुकीतून तालुक्याने व्यक्त केला अभिमान

**महागाव | तालुका प्रतिनिधी**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षणाच्या बळावर ग्रामीण भागातील तरुणाने मिळविलेल्या उल्लेखनीय यशाचा महागाव तालुक्याने अभूतपूर्व उत्साहात गौरव केला. भांब या ग्रामीण भागातील कष्टकरी कुटुंबातून शिक्षण घेत ॲड. आकाश डी. बी. नाईक यांनी विधी सहाय्यक तथा धर्मादाय आयुक्त या उच्च पदावर नियुक्ती मिळवून आपल्या कर्तृत्वाची प्रभावी छाप उमटविली. त्यांच्या या यशानिमित्त महागावमध्ये राजेशाही थाटात भव्य अभिनंदन सोहळा आणि लक्षवेधी मिरवणूक काढण्यात आली.

विशेष म्हणजे, या कार्यक्रमाची माहिती प्रामुख्याने समाजमाध्यमांवरून प्रसारित झाली असतानाही महागाव तालुक्यातील विविध समाजघटकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, वकील, शिक्षक, नागरिक आणि आकाश नाईक यांचे आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने संपूर्ण सोहळ्याला अभूतपूर्व स्वरूप प्राप्त झाले.

**राजकीय मतभेद बाजूला; कर्तृत्वाच्या सन्मानासाठी सर्वजण एकत्र**

नाईक कुटुंबाशी असलेले सामाजिक व कौटुंबिक संबंध जपत राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या पत्नी ॲड. सौ. मोहिनी नाईक यांनी संपूर्ण कार्यक्रमाला उपस्थित राहून आकाश नाईक यांच्या यशाचे कौतुक केले. यावेळी सत्ताधारी आमदार किसनराव वानखेडे, माजी आमदार राजेंद्र नजरधणे, माजी आमदार विजयराव खडसे, तहसीलदार अभय मस्के, रमेश रावजी चव्हाण, दीपक आडे, प्रमोद भरवाडे, सुरेश पाटील नरवाडे, एच. एम. चव्हाण, प्रा. शरद डोंगरे, मोतीराज जाधव, व्ही. डी. राठोड, मधुकर पाटील, मोहन पांडे, मनीष राठोड, बाबुसिंग आडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

**कुटुंबीयांचा आनंद; संघर्षातून उभ्या राहिलेल्या यशाला भावनिक सलाम**



आकाश नाईक यांच्या यशामागे उभ्या असलेल्या कुटुंबीयांची उपस्थितीही सोहळ्याचे खास आकर्षण ठरली. त्यांचे वडील ॲड. कॉम्रेड डी. बी. नाईक, आई सौ. वंदना नाईक, मावसा पी. के. राठोड सर, मावशी रंजना राठोड, उषाबाई राठोड, आजी पुनाबाई भिवंसिंग नाईक तसेच एस. के. राठोड, निरंजन आडे, डी. एस. राठोड, लखन जाधव, प्रा. प्रशांत आडे, सुधीर राठोड, प्रा. निसर्ग आडे अजय राठोड सर, नितीन राठोड .यांच्यासह बहिणी व आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ढोल-ताशांच्या गजरात महागाव दुमदुमले**

शहरातील महापुरुषांना अभिवादन करून मिरवणुकीला सुरुवात झाली. बँडच्या तालासोबत पारंपरिक ढोल-ताशांचा गजर, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि बंजारा पारंपरिक वेशभूषेतील महिलांचा सहभाग यामुळे संपूर्ण वातावरण उत्सवमय झाले. पारंपरिक वेशभूषेतील महिलांनी केलेले नृत्य आणि आनंदोत्सवाने मिरवणुकीची शोभा आणखी वाढविली.

ग्रामीण भागातील एका तरुणाच्या यशासाठी अशा पद्धतीने निघालेली भव्य मिरवणूक महागावकरांसाठी आगळावेगळा अनुभव ठरली. अनेकांच्या चेहऱ्यावर आकाश नाईक यांच्या यशाचा अभिमान आणि आनंद स्पष्टपणे दिसून येत होता.

**राजकारणापलीकडचा सन्मान; सामाजिक संघटनांचे प्रभावी नियोजन**

या सोहळ्याचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे पत्रकार महासंघ, वकील संघ, गोर सेना आणि गोरशिकवाडी या राजकारणविरहित संघटनांनी केलेले शिस्तबद्ध नियोजन. कोणत्याही राजकीय पक्षाचा रंग न देता एका सामान्य ग्रामीण कुटुंबातील तरुणाच्या कर्तृत्वाचा सर्वांनी मिळून केलेला गौरव हा या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला.

**कष्टकरी चळवळीतील कार्यकर्त्याच्या मुलाची गरुडभरारी**

कॉ. डी. बी. नाईक हे कष्टकरी जनतेच्या प्रश्नांसाठी दीर्घकाळ कार्यरत असलेले कार्यकर्ते म्हणून परिसरात परिचित आहेत. अशा कुटुंबातून आलेल्या आकाश नाईक यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि शिक्षणाच्या जोरावर उच्च पद गाठले. त्यामुळे त्यांचे यश हे केवळ एका कुटुंबाचे यश न राहता ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थी आणि तरुणासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

**एका तरुणाचे यश, संपूर्ण तालुक्याचा उत्सव**

आकाश नाईक यांच्या सन्मानार्थ निघालेली मिरवणूक आणि अभिनंदन सोहळा हा महागाव तालुक्याच्या सामाजिक जीवनातील लक्षवेधी प्रसंग ठरला. एका व्यक्तीच्या कर्तृत्वाचा आनंद संपूर्ण तालुक्याने आपला मानत मोठ्या उत्साहाने साजरा केला. ग्रामीण भागातही गुणवत्तेला, शिक्षणाला आणि कर्तृत्वाला समाजाकडून मोठा सन्मान मिळू शकतो, याचे हे जिवंत उदाहरण ठरले.

**गजानन वाघमारे यांच्या रंगदार निवेदनाने कार्यक्रमाला लाभली वेगळीच रंगत**

प्रसिद्ध गजलकार गजानन वाघमारे यांच्या प्रभावी आणि ओघवत्या निवेदनाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. त्यांच्या शैलीदार सूत्रसंचालनामुळे संपूर्ण सोहळ्यात उत्साह, भावनिकता आणि प्रसन्न वातावरण कायम राहिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. भगवानराव नामदेवराव कदम होते. कार्यक्रमाच्या शेवटी कॉ. देविदास मोहकर यांनी उपस्थितांचे आभार मानून सोहळ्याची सांगता झाल्याचे जाहीर केले.

**आयोजनकर्त्यांच्या नियोजनाला यश**

या भव्य अभिनंदन सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी संतोष राठोड, दयाराम जाधव, रामदास मोहकर सुनील पवार, पांडुरंग मुडे, कैलास राठोड, नंदू महाराज, बंडू महाराज, अशोक महाराज, दीपक देशमुख, अजेश जाधव, गणेश तिघलवाड, संजय डांगे, विनोद आडे, बाळू रणमल्ले, प्रकाश ढगे, विठ्ठल घावस आणि दिलीप भिसे यांनी परिश्रम घेतले.

आकाश नाईक यांच्या यशाचा महागाव तालुक्याने केलेला हा गौरव म्हणजे केवळ एका तरुणाचे अभिनंदन नाही, तर ग्रामीण कर्तृत्वाला मिळालेली सामूहिक सलामी आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षण, जिद्द आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, हा प्रेरणादायी संदेश या सोहळ्याने महागावच्या तरुणाईसमोर ठेवला आहे. या अभिनंदन सोहळ्याच नियोजन नंदू कावळे, संतोष राठोड, दयाराम जाधव, सुनील पवार, पांडुरंग मुडे, कैलास राठोड,नंदू महाराज, बंडू महाराज, अशोक महाराज, दीपक देशमुख, अजेश जाधव, गणेश तिघलवाड, संजय डांगे, विनोद आडे, बाळू रणमल्ले, प्रकाश ढगे, विठ्ठल घावस, दिलीप भिसे यांनी यशस्वी केले

# आ. धनंजय मुंडे यांच्या संपर्क कार्यालयाच्या तत्परतेला यश; परळीतील बेपत्ता मुलगा लातूर रोड रेल्वे स्टेशन येथे सापडला

**परळीतून बेपत्ता झालेला मुलगा लातूर रोड रेल्वे स्थानकावर सुखरूप सापडला**

**नगरसेवक अजिज कच्छी, युवा नेते राजुभाई शेख यांच्या प्रयत्नांतून बेपत्ता मुलगा लातूर रोड येथे सुखरूप सापडला**

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी वैजनाथ शहरातील एक मुलगा कुणालाही न सांगता परळी वैजनाथ रेल्वे स्थानकावरून रेल्वेत बसून हैदराबादला जात असल्याचे सांगत घरातून निघून गेल्याने काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

मुलगा बेपत्ता असल्याची माहिती समोर आल्यानंतर त्याचा शोध घेण्यासाठी नागरिकांनी तत्काळ सोशल मीडियावर पोस्ट प्रसारित करून मदतीचे आवाहन केले. तसेच परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या संपर्क कार्यालयातील टीमनेही तातडीने यंत्रणा हलवत मुलाचा शोध घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. या प्रयत्नांना यश आले असून, संबंधित मुलगा लातूर रेल्वे स्थानकावर सुखरूप आढळून आला. लातूर रेल्वे सुरक्षा बलाने त्याला त्याचे मामा (जब्बर शेख) यांच्याकडे स्वाधीन केले. मुलगा सुखरूप सापडल्याने कुटुंबीयांसह नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

"मुलगा बेपत्ता असल्याची माहिती नगरसेवक अजिज कच्छी व युवा नेते राजुभाई शेख यांनी माहिती मिळताच आ. धनंजय मुंडे साहेब यांच्या जगमित्र कार्यालयाच्या माध्यमातून तातडीने यंत्रणा सक्रिय करण्यात आली. सोशल मीडिया तसेच संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून मुलाचा शोध घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. अखेर मुलगा लातूर रोड रेल्वे स्थानकावर सुखरूप सापडल्याची माहिती मिळाल्याने मोठा दिलासा मिळाला. मुलाला त्याच्या मामा (जब्बर शेख) यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. अशी माहिती संपर्क कार्यालय जगमित्र कार्यालय, परळी वैजनाथ यांनी दिली आहे. तसेच नातेवाईक यांनी आ. धनंजय मुंडे साहेब यांचे आभार मानले आहेत.



# विशेष


## दलाई लामा



दलाई लामा म्हणजे तिबेटचे सर्वोच्च धार्मिक नेते होत. चौदावे दलाई लामा तेन्झिन ग्यात्सो सध्याचे दलाई लामा आहेत. चीन ने तिबेट हा देश ताब्यात घेतांना विरोध केल्याने यांनी हिमाचल प्रदेश या राज्यात धरमशाला येथे आश्रय घेतला आहे. तिबेटमध्ये दलाई लामांची परंपरा चौदाव्या शतकापासून सुरु झाली. 'दलाई' म्हणजे ज्ञानाचा सागर व 'लामा' म्हणजे तिबेटीयन बुद्धिष्ट गुरु किंवा शिक्षक. पहिले लामा जेनडून द्रूप हे विहाराचे उच्च लामा झाले. 'ड्रेपुंग' हा तिबेटमधील सर्वात भव्य विहार आहे. पहिल्या लामांनंतर प्रत्येक नवा दलाई लामा हा पूर्वीच्या लामाचा अवतार मानला जाऊ लागला.

> सध्या दलाई लामा हे तिबेटीय लोकांचे सर्वोच्च धार्मिक नेते व शासन प्रमुख देखील आहेत. इ.स. 1391 ते इ.स. 1933 या कालखंडात तेरा दलाई लामा होऊन गेले. तिबेटीय परंपरेनुसार ज्येष्ठ धर्मगुरु व शासन मिळून नवीन दलाई लामा निवडीची जबाबदारी पार पाडतात.दलाई लामा तिबेटचे सर्वोच्च धार्मिक नेते होत. सध्याचे दलाई लामा आहेत. चौदावे दलाई लामा तेंझिन गियात्सो चीन ने तिबेट हा देश ताब्यात घेतांना विरोध केल्याने यांनी हिमाचल प्रदेश या राज्यात धरमशाला येथे आश्रय घेतला आहे. तिबेटमध्ये दलाई लामांची परंपरा चौदाव्या शतकापासून सुरु झाली. 'दलाई' म्हणजे ज्ञानाचा सागर व 'लामा' म्हणजे तिबेटीयन बुद्धिष्ट गुरु किंवा शिक्षक. पहिले लामा जेनडून द्रूप हे विहाराचे उच्च लामा झाले. 'ड्रेपुंग' हा तिबेटमधील सर्वात भव्य विहार आहे.

## गुलामगिरीची सवय नको



एका माणसाने त्याच्या घरी एक पोपट पाळला होता. पिंज-यात ठेवलेल्या पोपटाला चांगले खायलाप्यायला मिळत असे व पोपट बोलका असल्याने घरातील लोकांकडून त्याचे फार कौतुकही केले जाई. पण पोपटाच्या मनात मात्र पारतंत्र्याचे शल्य दाटून येई. अखेर एकेदिवशी पोपटाला संधी चालून आली. त्या माणसाने पोपटाला खाणे देण्यासाठी पिंज-याचे दार उघडले होते व त्याच्याहातून ते तसेच उघडे राहिले होते. माणसाला अचानक काही काम आल्याने तो ते दार उघडे टाकून निघून गेला असता पोपट पिंज-याच्या बाहेर निघून गेला. पण लहानपणापासूनच पिंज-यात राहिला असल्याने त्याला फारसे नीट उडताच येत नव्हते. एका झाडावर गेला असता त्याला इतर पोपटांशी बोलता येईना कारण लहानपणापासूनच तो परकी भाषा शिकत असल्याने त्याला पोपटांची भाषा येत नव्हती म्हणून इतर पोपटही त्याला सहकारी मानत नव्हते. पिंज-यात आयते खायची सवय असल्याने त्याला अन्न मिळवणे अवघड जाऊ लागले व ऊन वारा पाऊस यांची कधीच सवय नसल्याने तो आजारी पडला व मरून गेला.

**तात्पर्य** : जास्त काळ पारतंत्र्यात( गुलामगिरीत ) राहिल्याने तशीच गुलामगिरीची सवय अंगात मुरुन राहते.

## प्राण्यांची ओळख

### पांढरा अवाक





कोंबडीपेक्षा मोठा साधारण 75 सें. मी. आकाराचा पांढरा अवाक पक्षी मुख्यत्वे काळ्या आणि पांढऱ्या रंगाचा आहे. याची चोच, डोके आणि मान तसेच पाय काळ्या रंगाचे असून उर्वरीत पक्षी पांढऱ्या रंगाचा आहे. याची चोच लांब आणि बाकदार असते. वीण काळात नराच्या पाठीकडील भाग आणि पंख काळपट करड्या रंगाचे होतात. एरवी नर-मादी दिसायला सारखेच असतात. हे पक्षी पाणथळ भागात थव्याने राहतात.भारतासह नेपाळ, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, म्यानमार, जपान पर्यंत दक्षिण आशियाई देशात पांढरा अवाक पक्ष्याचे वास्तव्य आहे. हे भारतात निवासी आणि स्थानिक स्थलांतर करणारे आहेत. दलदलीचे प्रदेश, सरोवरांच्या भागात आढळणारा हा पक्षी काळा अवाक तसेच बगळ्यांसह राहतो. सकाळ-संध्याकाळ एखाद्या झाडावर सर्व एकत्र जमतात. अशा जागेला सारंगागार म्हणतात.उथळ पाण्यात चोच बुडवून एकट्याने आणि लहान-मोठ्या थव्याने हे पक्षी दिवसभर खाद्य शोधत फिरतात. सरडे, गोगलगाय, बेडुक, मासोळ्या, खेकडे वगैरे पाण्यात राहणारे जीव पांढरा अवाक पक्ष्यांचे खाद्य आहे.

## कविता

### ताई रडू नको !

ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते
तुझे आसू माझ्या गाली,
ओघळती वाटते !
नीज माझ्या मांडीवरी
गातो तुला मी अंगाई
डहाळीची दोन फुले
माझी तुझी एक आई
मीट पाहू डोळे ओले
कापरे की ओठ ते
ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते
किती किती
दिवसांनी तुझी माझी
झाली भेट
जन्म झाल्यापासूनिया
पहातो मी गे तुझी वाट
पुन्हा पुन्हा का ग डोळा
पाणी तुझ्या साठते
ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते !
देतो तुला माझा खेळ
ताई नको गं रागाऊ
चिमणीच्या दातांनी
माझ्यातला देतो खाऊ
पापे देतो गालाचे मी

# बीड-परळी महामार्गावर 'बोगस' कामाचा धुरळा!

## दिंद्रुड-सिरसाळा रस्त्याच्या दर्जाहीन कामाविरोधात नागरिकांचा एल्गार !





**सार्वजनिक पैशांची उधळपट्टी?** | **'गुणवत्तेशी तडजोड खपवून घेणार नाही!'** | **तांत्रिक निकषांचे आणि नियमांचे उल्लंघन?**

## बीड-परळी मार्गावरील रस्त्याच्या कामावर निकृष्ट दर्जाचा नागरिकांचा ठपका कंत्राटदारावर कारवाईची मागणी !

**विशेष वृत्त: अतुल बडे**

बीड–परळी या महत्त्वाच्या महामार्गावरील दिंद्रुड ते सिरसाळा दरम्यान सुरू असलेले काम सध्या तीव्र वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. "सार्वजनिक निधीतून होणाऱ्या कामात गुणवत्तेशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही," असा इशारा देत सामाजिक कार्यकर्ते दत्ता बडे (खामगाव) यांनी या कामावर 'बोगस' आणि निकृष्ट दर्जाचा थेट आरोप केला आहे. कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांच्या संगनमताने जनतेच्या पैशांची उधळपट्टी सुरू असल्याचा आरोप करत स्थानिकांनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला आहे.

सध्या सुरू असलेले हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आणि 'बोगस' पद्धतीने केले जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. सार्वजनिक निधीचा गैरवापर रोखण्यासाठी शासनाने व संबंधित विभागाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या रस्त्याच्या बांधकामात अत्यंत दर्जाहीन आणि निकृष्ट साहित्याचा वापर केला जात आहे. तसेच रस्ता तयार करताना आवश्यक असलेल्या तांत्रिक निकषांचे आणि नियमांचे पूर्णपणे उल्लंघन केले जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे हा रस्ता काही दिवसांतच उखडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सार्वजनिक पैशातून होणाऱ्या विकासाच्या कामात गुणवत्तेशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही," अशी आक्रमक भूमिका सिरसाळा परिसरातील नागरिकांनी घेतली आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांकडून दिला जात आहे.



**"बीड–परळी महामार्गावरील दिंद्रुड ते सिरसाळा रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आणि बोगस पद्धतीने सुरू आहे. जनतेच्या करातून होणाऱ्या कामात अशी उघडउघड उधळपट्टी आणि भ्रष्टाचार खपवून घेतला जाणार नाही. या कामात दर्जाहीन साहित्य वापरले जात असून तांत्रिक निकष पूर्णपणे बाजूला ठेवण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने आणि शासनाने या कामाची तात्काळ स्वतंत्र चौकशी करावी. जर कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली नाही, तर स्थानिकांना सोबत घेऊन प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल."**

**- दत्ता बडे** (खामगाव)



# माजी मंत्री आ.बसवराज पाटील श्री एकविरा मातेच्या चरणी नतमस्तक जनकल्याणाचे घातले साकडे

**महागाव |** उस्मानाबाद - बीड - लातूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचे नवनिर्वाचित विधान परिषद सदस्य आ.बसवराज पाटील यांनी हिवरा (संगम) श्री एकविरा देवी संस्थानला भेट देवून श्री एकविरा मातेचे मनोभावे दर्शन घेत जन कल्याणाचे श्री एकविरा मातेच्या चरणी साकडे घातले.

उस्मानाबाद - बीड - लातूर विधानपरिषद मतदार संघाचे नवनियुक्त आमदार तथा भाजपा लातूर(ग्रामीण) जिल्हाध्यक्ष माजी मंत्री बसवराज पाटील यांनी माता सतीचा उजवा बाहू पडून माता स्थित झालेल्या अष्टादश शक्तिपीठ असलेल्या श्री. एकविरा संस्थान येथे आपल्या सहकाऱ्यांसह भेट देवून श्री एकविरा मातेचे दर्शन घेवून सर्व जनतेच्या कल्याणाची प्रार्थना मातेच्या चरणी केली. यावेळी त्यांच्या समवेत शिरीष उटगे, बसवराज धाराशिवे, प्रकाश आष्टे, दिलीप भालेराव उपस्थित होते.

याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त व विदर्भ बैलगाडा शर्यत संघटना अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव पाटील कदम (हिवरेकर) यांनी आ.बसवराज पाटील यांचा शाल व श्रीफळ देवुन सत्कार केला. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष योगेश वाजपेयी, शिवसेना महागाव तालुका प्रमुख तथा माजी न.प. सभापती राजू राठोड, माजी सरपंच प्रवीण जामकर, महागाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश कामारकर, मनसे तालुकाध्यक्ष सुनिल चव्हाण, विनोद खोंडे, देवेंद्र कदम, शैलेश पेंटावाड, माजी. ग्रा.पं. सदस्य विलास कोथळे ,दादाजी सत्संग आश्रमचे अध्यक्ष सुधाकर जामकर, बाळू राऊत , संदीप खोंडे, वैभव कोत्ताकोंडावार आदी उपस्थित होते.श्री एकविरा मातेचे मनोहारी दर्शन करून कृतकृत्य होवुन या ठिकाणी असलेल्या पुस नदीच्या सानिध्यातील निसर्गरम्य वातावरणामुळे मन अगदी प्रसन्न झाल्याची प्रतिक्रिया यावेळी आ.पाटील यांनी व्यक्त केली.

**खोंडे व कामारकर परिवाराकडून सत्कार.**

आ. बसवराज पाटील हिवरा(संगम) येथे आले असतांना त्यांनी स्वीय सहाय्यक हरीश कामारकर व शिवसेनेचे विनोद खोंडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. तेव्हा कामारकर परिवारातील सौ.राधाबाई भिमराव कामारकर,महेश कामारकर,हरीश कामारकर, कु.तक्षिवी महेश कामारकर,खोंडे परिवारातील सौ.सुशीलाबाई मारोतरावजी खोंडे, सौ.वर्षाताई विनोद खोंडे,सौ.प्रियांका संदिप खोंडे , चि.रुद्र खोंडे,वेदांत खोंडे,आयुष खोंडे यांनी आ.पाटील यांच्या निवडीबद्दल शाल ,श्रीफळ, पुष्पगुच्छ व छत्रपती शिवरायांचा अर्धाकृती पुतळा भेट देवून सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

संकल्प करण्याचा दिवस ठरावा. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली ठेवत, ज्ञानाचा प्रकाश समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवत आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या संविधानिक मूल्यांना बळकटी देत विद्यापीठाची ज्ञानयात्रा अखंड सुरू राहो. मराठवाड्याच्या मातीतील ज्ञान, संघर्ष आणि परिवर्तनाच्या परंपरेला आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाची जोड देत हे विद्यापीठ राष्ट्रीय तसेच जागतिक ज्ञानविश्वात अधिक प्रभावी स्थान निर्माण करो, हीच



विद्यापीठाच्या ६८व्या वर्धापनदिनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा.

डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत)

